१९

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० फेब्रुवारी २००४

### शुद्धिपत्र

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र. क्र. ४६२/म-१.––महाराष्ट्र शासन **असाधारण राजपत्र** भाग ४ब मधील पृष्ठ क्रमांक १३४९ मध्ये दिनांक २९ डिसेंबर २००३ रोजी प्रसिद्ध झालेल्या समक्रमांकाच्या शासन आदेशातील स्पष्टीकरण मध्ये नमूद केलेले " या आदेशाच्या प्रयोजनार्थ, भाडेपट्ट्याने देणाऱ्या व वित्त व्यवस्था संस्था/कंपन्या याचा अर्थ, रिझर्व बँक ऑफ इंडिया, किंवा यथास्थिती, कंपन्यांचे निबंधक यांनी अशा प्रकारे प्रमाणित केले आहे अशा संस्था किंवा कंपन्या, असा आहे " च्या ऐवजी " (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ, भाडेपट्ट्याने देणाऱ्या व वित्त व्यवस्था संस्था/कंपन्या याचा अर्थ, रिझर्व बँक ऑफ इंडिया, किंवा यथास्थिती, कंपन्यांचे निबंधक यांनी अशा प्रकारे प्रमाणित केले आहे अशा संस्था किंवा कंपन्या, असा आहे." (२) या आदेशाच्या प्रयोजनार्थ, " माहिती तंत्रज्ञान युनिट " आणि " माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट " याचा अर्थ, सामूहिक प्रोत्साहन योजना, २००१ अंतर्गत व्याप्ती क्षेत्रे म्हणून वर्गीकरण करण्यात आलेल्या गट " अ " व गट " ब " या व्याप्ती क्षेत्रामधील बिगरसरकारी क्षेत्रात विकास आयुक्त (उद्योग) यांने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने असे युनिट म्हणून प्रमाणित केलेली युनिटे, असा आहे " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.